**नियमित दिवाणी दावा क्र. ३/२०१५**

नम्रता विरुध्द जिजाबाई व इतर

**अर्ज नि.२० खालील आदेश**

१. प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुध्द नि.१ वर निर्गमित करण्यात आलेला दावा विना कैफियत व विना म्हणणे चालविण्याचा आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे आहे की, त्यांचेविरुध्द प्रस्तुतकामी वर नमुद आदेश झाला आहे. त्यांनी कैफियत व म्हणणे सादर करणेस जाणुनबुजून विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ ही वृध्द महिला असून, तिला कमी रक्तदाबाचा व संधीवाताचा त्रास असलेने महत्वाची कागदपत्रे जमवाजमव करणे शक्य झाले नाही. वादग्रस्त मिळकतीविषयी वेगवेगळया न्यायालयात वेगवेगळे खटले चालू असल्याने देखील प्रतिवादींना वेळेत कागदपत्रे मिळविणे अशक्य झाले होते. त्यांना न्यायालयीन कामकाजाची पुरेसी माहिती नाही. सन १९५६ पासून ते आजपर्यंतचे फेरफार उतारे प्रतिवादींना वेळेत उपलब्ध न झालेने त्यांना कैफियत दाखल करता आली नाही. अर्ज मंजूर करण्याने वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. परंतु, अर्ज नामंजूर झाल्यास प्रस्तुत प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

३. वादींतर्फे प्रस्तुत अर्जाकरीता आपले म्हणणे सादर करण्यात आले असून, त्याने अर्जातील कथनांना विरोध दर्शविलेला आहे. वादींचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, प्रस्तुतचा अर्ज त्यांना मान्य व कबूल नाही. अर्जातील मजकुर खोटा व चुकीचा आहे. अर्जाचे पुष्टयर्थ वैदयकीय प्रमाणपत्र हजर करण्यात आलेले नाही. केवळ कामकाज लाबविण्याच्या गैरहेतूने प्रस्तुतच्या अर्जाची रचना करण्यात आली आहे. ब-याच कालावधीनंतर प्रस्तुतचा अर्ज दिला असल्याने तो कायदयाने चालण्यास पात्र नाही. त्यामुळे प्रतिवादींवर जास्तीत जास्त खर्च आकारुन अर्ज रद्द करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादींनी केली आहे.

४. अभिलेख व रोजनामा वाचला. त्यावरुन असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांचेविरुध्द दावा व अर्ज अनुकमे विना

कैफियत व विना म्हणणे चालविण्याचा आदेश नि.१ वर दिनांक २०.११.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. प्रस्तुतचा अर्ज तो आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दिनांक ०४.०३.२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.

५. अर्जातील संपूर्ण मजकर पाहता; प्रतिवादी क्र.१ हिच्या कथित आजारपणामुळे व जुने फेरफार उतारे वेळेत न मिळाल्यामुळे प्रस्तुत प्रतिवादींना कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही असे त्यांचे एकंदरीत म्हणणे आहे. तथापि; अर्जातील कथनांचे पुष्टयर्थ सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा त्यांनी सादर केला नाही. यावरुनच असे दिसून येते की, अर्जामध्ये प्रतिवादींनी दिनांक २०.११.२०१५ रोजीचा आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी कोणतेही संयुक्तीक समाधानकारक कारण नमूद केलेले नाही. तरी परंतु, प्रस्तुतच्या दाव्यातील उभय पक्षकारांमधील ख–याखु–या वादाचे अंतिमतः निराकरण करण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची आणखी एक संधी देणे आवश्यक वाटते. तसे करण्याने वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. तथापि; अर्ज नामंजूर करण्याने प्रस्तुत प्रतिवादींचे अतोनात असे नुकसान होणार आहे. तथापि; वादकथने पहाता; वादग्रस्त मिळकतीच्या अनुषंगाने वादींनी प्रतिवादींविरुध्द कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेची व हक्कज्ञापन मिळणेची मागणी केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादींना न्यायाच्या दृष्टीकोनातून आणखी एक संधी देणे उचित होणार आहे. तसे करण्याने दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय गुणवत्तेवर करणे सुलभ होणार आहे. तथापि; प्रस्तुत प्रतिवादींनी याकामी कैफियत दाखल करण्यास जो काही विलंब केला आहे तो पहाता; त्यांचेवर ४००/–रुपये खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे उचित राहील. खर्चाची रक्कम ही प्रस्तुत प्रतिवादींनी वादींना दयावी असा हुकूम करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज, प्रतिवादी क्र.१ व २ यांचेकडून वादींना रक्कम रुपये ४००/– (रुपये चारशे ) फक्त खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. नि.१ वरील दिनांक २०.११.२०१५ रोजीचा प्रतिवादी क्र.१ व २ यांचे विरुध्द निर्गमित करण्यात आलेला दावा व अर्ज अनुक्रमे विनाकैफियत व विना म्हणणे चालविण्याचा आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. अर्ज वरीलप्रमाणे निकाली काढण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.) सही /–

दिनांक २२ एप्रिल, २०१६ ( आर. आर. काळे)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कुरुंदवाड.

I affirm that the contents of this P. D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.K.Yadav, Stenographer (L.G.) |
| Name of the Court | Civil Court Jr. Dn., Kurundwad. |
| Date of Dictation | 22.04.2016 |
| Order signed by the P. O. on | 22.04.2016 |
| Order uploaded on | 27.04.2016 |